# दलवाईंबाबत शुक्रवारपासून चर्चासत्र

## शिवाजी विद्यापीठात आयोजन : आठ सत्रांत वक्ते विचार मांडणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : साहित्यिक व समाजसुधारक अशी दुहेरी ओळख असणारे हमीद दलवाई यांच्याबाबत शुक्रवारी (दि. १३) आणि शनिवारी (दि. १४) शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र होणार आहे. त्यात एकूण आठ सत्रांमध्ये मिळून २२ वक्ते विचार मांडणार आहेत. राज्यभरातील दीडशेहून अधिक विद्यार्थी, प्राध्यापक, कार्यकर्ते यांनी आतापर्यंत सहभाग नोंदविला आहे. शिवाजी विद्यापीठाचा मराठी विभाग, साधना साप्ताहिक व हमीद दलवाई इस्लामिक रिसर्च इन्स्टिट्यूटच्यावतीने हे चर्चासत्र आयोजित केले आहे.

या चर्चासत्राचे उद्घाटन शुक्रवारी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ साहित्यिक राजन गवस यांच्या हस्ते होणार असून, अभ्यासक विनय हर्डीकर हे बीजभाषण करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील.

अनेक मोर्चे, आंदोलने, परिषदा, भाषणे या माध्यमांतून दलवाई यांनी १९६५ नंतरच्या दशकभरात देशभर वादळ निर्माण केले होते. या तिन्ही प्रकारच्या कार्याची चिकित्सा या चर्चासत्रामध्ये होणार आहे.

शनिवारी दुपारी बारा वाजता डॉ. सदानंद मोरे, निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत चर्चासत्राचा समारोप होणार आहे, अशी माहिती मराठी विभागाचे प्रमुख प्रा. रणधीर शिंदे, साधनाचे संपादक विनोद शिरसाठ आणि इन्स्टिट्यूटच्या अध्यक्ष इला दलवाई यांनी दिली.

### असे होणार चर्चासत्र

- शुक्रवारी : दुपारी १२.३० वाजता : 'तरीही मी मुसलमान आहे' या मुलाखतीचे नाट्यरुप सादरीकरण. वक्ते शमसुद्दीन तांबोळी (विषय : मुस्लिम सत्यशोधक मंडळ : काल आणि आज).



दुपारी २.३० वाजता : इक्बाल मुल्ला, अन्वर राजन, सय्यदभाई (मुस्लिम समाजातील सुधारणा : काल आणि आज). दुपारी ३. ३० वाजता : प्रवीण बांदेकर, नितीन रिंढे, रझिया पटेल (हमीद दलवाई यांचे कथात्म साहित्य). दुपारी ४. ४० वाजता : 'द अनसंग ह्युमॅनिस्ट' माहितीपटाचे सादरीकरण व दिग्दर्शक ज्योती सुभाष यांच्याशी संवाद

- शनिवारी : सकाळी १० वाजता : दीपाली अवकाळे, गौरी पटवर्धन, चंद्रकांत पोकळे, सुनीलकुमार लवटे (दलवाईंच्या लेखनाचे अनुवाद). सकाळी ११ वाजता : समीर शेख, हिनाकौसर खान, अझरुद्दीन पटेल (नव्या पिढीचे मनोगत)

# समाज पुनर्रचनेवर विद्यापीठात परिषद

कोल्हापूर : सुवर्णमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाकडून 'समाज पुनर्रचना' हा बीजविषय घेऊन आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. १० ते १२ डिसेंबर असे तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेचे उद्‌घाटन मानवी हक्क कार्यकर्त्या गेल ऑम्व्हेट यांच्या हस्ते आज, मंगळवारी सकाळी १०.३० वाजता राजर्षी शाहू सिनेट हॉलमध्ये होणार आहे. भारतीय सामाजिक शास्त्रे संशोधन संस्थेचे माजी अध्यक्ष प्रा. डॉ. सुखदेव थोरात यांचे बीजभाषण होणार आहे.

कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी ही माहिती दिली. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. जगन कराडे उपस्थित होते. या परिषदेला १५ ते १६ देशांतील विचारवंत, प्राध्यापक, संशोधक उपस्थित राहणार आहेत.

# कॅम्पस मुलाखतीमध्ये विद्यापीठातील १७७ जणांना नियुक्ती पत्रे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने बहुराष्ट्रीय कंपनीसाठी कॅम्पस मुलाखतीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यापीठातील रसायन शास्त्र व औषध निर्माण शास्त्र विषयातील ११७ विद्यार्थ्यांनी एकाच दिवशी यश संपादन केले. तसेच या सर्व विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्रेही देण्यात आली.

या मुलाखतीमध्ये महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, बिहार, प. बंगाल, कर्नाटक, गोवा तसेच महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील एकूण ५३७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे उद्घाटन रसायनशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉक्टर जी. एस. गोकावी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी यावेळी उपस्थितांना मुलाखत तंत्र याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. जयदीप बागी, डॉ. पी.डी. पाटील, डॉ. जी. एस. राशीनकर, महेश चव्हाण आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाकडून गोव्याचा धुव्वा

## पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धा : अखिल भारतीय स्पर्धेसाठी पात्र

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

भोपाळ (मध्य प्रदेश) येथील बरकतउल्ला विद्यापीठाच्या मैदानावर सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेत सोमवारी शिवाजी विद्यापीठाने लक्षणीय खेळाचे प्रदर्शन करत बलाढ्य गोवा विद्यापीठाचा ५ - १ गोलने धुव्वा उडवला. या विजयाबरोबरच शिवाजी विद्यापीठाचा संघ जालंधर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी पात्र ठरला. जखमी प्रतीक बदामेच्या अनुपस्थितीत शिवाजी विद्यापीठाचा संघ मैदानात उतरला होता.

सामन्याच्या पहिल्या मिनिटापासून शिवाजी विद्यापीठच्या संघाने शॉर्ट पासिंगवर भर देत गोव्याची बचाव फळी खिळखिळी केली. चौथ्या मिनिटाला प्रथमेश कांबळेने मारलेल्या कॉर्नरवर प्रथमेश हेरेकरच्या पासवर पवन माळीने हेडद्वारा अप्रतिम गोल केला. या आघाडीबरोबरच शिवाजीच्या खेळाडूंनी गोव्याला पासिंग व आक्रमक चाली रचू दिल्या नाहीत. सामन्याच्या ९ व्या मिनिटाला प्रभू पोवारने आक्रमक चाल रचत डी रेषेवरून मारलेला फटका अलगद गोलजाळ्यात विसावला व शिवाजी संघाला २ गोलची आघाडी मिळाली, तर लगेचच १२ व्या मिनिटाला मिळालेल्या संधीचे सोने करत मध्यरेषेपासून प्रथमेश हेरेकरने चेंडूवर ताबा मिळवत जोरदार फटका मारत गोल नोंदवला.

सामन्याच्या मध्यंतरानंतर गोवा संघाने शॉर्ट पासिंगचा खेळ करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या संघावर दबाव वाढला; परंतु ४० व्या मिनिटाला मध्यफळीत खेळणाऱ्या अक्षय पायमलने मध्यरेषेजवळ सुयश हांडेला पास दिला. हांडेने ॲडव्हान्स आलेल्या गोलकिपरला चकवून शिवाजीकडून चौथ्या गोलची नोंद केली. ४ गोलच्या ओझ्यानंतरही गोवा संघ गतिमान खेळ करत होता. ५५ व्या मिनिटाला गोव्याच्या दिशू सिंग याने डीच्या बाहेरुन मारलेला फाऊल गोलकिपर मयुरेशने टॉस केला; पण चेंडू लहान डीमध्ये पडल्याने उडालेल्या गोंधळात शिवाजी संघावर एका गोलची नोंद झाली. त्यानंतर पुन्हा एकदा शिवाजीच्या सुयश हांडेला मध्यफळीत कर्णधार राहुल पाटीलकडून पास मिळाला. सुंदर ड्रिबलिंग करत सुयश हांडेने डीच्या बाहेरून गोलकिपरला चकवत स्वतःच्या दुसऱ्या व संघाच्या पाचव्या गोलची नोंद केली. शिवाजी विद्यापीठ संघाने गोवा विद्यापीठाला ५-१ अशा गोलसंख्येने पराभूत केले. मंगळवारपासून विजेतेपदासाठी लीग सामने खेळवण्यात येणार आहेत.



**भोपाळ : पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ पुरुष फुटबॉल स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू.**

शिवाजी विद्यापीठ संघामध्ये कर्णधार राहुल पाटील, ऋतुराज संकपाळ, अक्षय पायमल, आरबाज पेंढारी, प्रथमेश कांबळे, पवन माळी, चेतन डोंगरे, सौरभ आढाव, प्रथमेश हेरेकर, रोहित पोवार, प्रभू पोवार, ओंकार लायकर, ओंकार सुतार, मयुरेश चौगले, दिग्विजय सुतार, निखिल बचाटे, सुयश हांडे व संतोष कांबळे यांचा समावेश आहे. व्यवस्थापक डॉ. शिवराज गायकवाड यांनी, तर प्रशिक्षक म्हणून डॉ. अभिजित वणिरे यांनी काम पाहिले.

# समाजशास्त्र विभाग सुवर्णमहोत्सवी वर्षात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभाग सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे. गेल्या ५० वर्षात या विभागाने केवळ पश्चिम महाराष्ट्रच नाही, तर देशभरात सामाजिक मूल्ये रुजवण्यामध्ये योगदान दिले आहे. अशी देशभरात केवळ शिवाजी विद्यापीठ व केरळ विद्यापीठाचे समाजशास्त्र विभाग आहेत.

लोकशाही, समानता, सामाजिक न्याय आणि समाजासाठी आवश्यक समावेशकता यासारख्या मूल्यांच्या ज्ञानाची प्रगती आणि प्रसार करण्याचे काम समाजशास्त्र करत असते. जगभरात विविध नामांकित संस्थात समाजशास्त्राचा अभ्यास आणि अध्यापन करण्यात येते. १९७०-७१ मध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये विद्यार्थ्यांना अत्याधुनिक समाजशास्त्रीय ज्ञान, संशोधन क्षमता आणि कौशल्ये सुसज्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांची भारतीय समाज आणि जागतिक समाजाची समज समृद्ध करण्याठी स्वतंत्र्य अधिविभागाची स्थापना करण्यात आली. विशेषत: देशातील मुद्यांशी संबंधित समाजशास्त्रीय संशोधनास बळकटी देण्याचा उद्देश या विभागाने ठेवला होता.

स्थापनाप्रसंगी डॉ. एम. एम. आवटे हे प्रभारी विभागप्रमुख होते. त्या नंतरच्या काळात बी. बी. देशमुख, डॉ. एस. एन. पवार, उषा त्रिभुवन, डॉ. विलास संगवे, डॉ. आर. बी. पाटील, डॉ. एस. एम. दहिवाले, डॉ. जे. बी. आंबेकर ( यादव ), डॉ. एस. एन. पवार, डॉ. एस. ए. साळुंखे, डॉ. एम. एम. सावंत, प्रा. आर. एन. साळवे, बालाजी केंद्रे, पी. बी. देसाई, डॉ. प्रल्हाद माने, डॉ. सर्जेराव साळुंखे, प्रा. आर. बी. पाटील, प्रा. आर. एन. साळवे आदींनी समाजशास्त्र विभागात प्राध्यापक व प्रमुख जबाबदाऱ्या पार पाडल्या. १ मे २०१६ पासून प्रा. जगन कराडे हे विभाग प्रमुख म्हणून काम करत आहेत. या सर्वांनी वेळोवेळी शिवाजी विद्यापीठाच्या लौकीकामध्ये भर घातली.

## देशात दोन विभागांचा सुवर्णमहोत्सव

शिवाजी विद्यापीठातील समाजशास्त्र विभागातर्फे सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. देशभरात केवळ शिवाजी विद्यापीठ आणि केरळ विद्यापीठातील समाजशास्त्र विभागही ५० व्या वर्षात पदार्पण करत आहे.